सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२६/ 2348
दिनांक ० १ सप्टेंबर २०२६

प्रति,
प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालय संलग्नित व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग,अमरावती.

**विषय : महाडीबीटी २.० पोर्टलबाबतचे महाआयटीकडून संस्थांना देण्यात आलेले Login Credentials बाबत...**

**संदर्भ :** १.या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२६/२०३३ दिनांक ३०.०७.२०२६
२.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/४७२ दिनांक ३१.०८.२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन, या कार्यालयाच्या संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये, महाआयटीनुसार, संस्थेच्या ईमेल आयडीवर संस्था प्राचार्यांचे Login Credentials पाठविण्यात आलेले आहेत. परंतु काही संस्थांकडून डीबीटी पोर्टलचे Login Credentials प्राप्त झाले नसल्याबाबत किंवा कार्यरत असलेल्या प्राचार्यांना ओटीपी येत नसल्याबाबत तक्रारी दूरध्वनीवर प्राप्त झाल्या कारणास्तव ज्या संस्थांच्या प्राचार्यांना ईमेल आयडीवर Login Credentials प्राप्त झालेले नसतील किंवा कार्यरत असलेल्या प्राचार्यांना ओटीपी येत नसेल तर अशा संस्थांनी कार्यरत असलेल्या प्राचार्यांची अचूक माहिती पत्रात दिलेल्या तक्त्यामध्ये संस्थेच्या पत्राव्दारे दि.०३.०८.२०२६ पर्यंत विभागीय कार्यालयांना पाठविण्याबाबत सूचित करण्याबाबत आलेले होते. त्यानुसार संबंधित संस्थाकडून त्यांच्या पत्राव्दारे प्राप्त झालेली माहिती **महाडीबीटी २.० पोर्टलवर** अद्ययावत करण्यासाठी एकत्रितरित्या विभागीय कार्यालयाकडून संचालनालयास पाठविण्यात आलेली होती.

उपरोक्त संस्थांच्या प्राचार्यांची माहिती अद्ययावत करण्यासाठी प्राप्त झालेल्या तपशीलानुसार, संचालनालयाकडून **महाडीबीटी २.० पोर्टलवर** अद्ययावत करतेवेळी ज्या संस्थांच्या प्राचार्यांची माहिती त्यांच्याकडून देण्यात आलेल्या आधार कार्डवरील माहितीशी जुळली आहे, अशा प्राचार्यांची माहिती संचालनालयाकडून अद्ययावत करण्यात आली आहे व ज्या संस्थांच्या प्राचार्यांची माहिती चुकीची किंवा आधार कार्डशी जुळली नसल्याने, अशा प्राचार्यांची माहिती अद्ययावत करता आली नाही.

तरी, या विभागीय कार्यालयाचे अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना सूचित करण्यात येते की,

ज्या संस्थांच्या ईमेल आयडीवर **महाडीबीटी २.० पोर्टल बाबतचे** प्राचार्यांच Login Credentials प्राप्त झालेले नसतील किंवा पूर्वीच्या प्राचार्यांची बदली झाली असल्यास किंवा संस्थेत कार्यरत नसल्यास किंवा निवृत्त झाले असल्यास किंवा कार्यरत असलेल्या प्राचार्यांना त्यांच्या लॉगीनचा (जसे-DTXXXX_Principal) ओटीपी येत नसेल तर अशा

संस्थांनी कार्यरत असलेल्या **प्राचार्यांची अचूक माहिती खालील तक्त्यामध्ये संस्थेच्या पत्राव्दारे आधार कार्डच्या छायांकित प्रतीसह व Exel sheet मध्ये भरुन दिनांक ०४.०९.२०२६** पर्यंत विभागीय कार्यालयास पाठविण्यात यावी. जेणेकरुन संस्थेची प्राप्त माहिती **महाडीबीटी २.० पोर्टलवर** अद्ययावत करण्यात येईल व अद्ययावत केल्यानंतर महाआयटीकडुन सिस्टीमव्दारे Login Credentials पाठविण्यात येईल व तद्नंतर संस्थांना त्याचा वापर करुन महाडीबीटी २.० पोर्टलवरील पुढील कार्यवाही करता येईल. तसेच संस्थेकडून तंत्रशिक्षण संचालनालयाला परस्पर पाठविण्यात आलेले पत्र किंवा ईमेलची दखल घेतली जाणार नाही याची संस्थांनी नोंद घ्यावी.

| अ.क्र. | संस्थेचा डीटीई कोड | संस्थेचे नाव | डीबीटी पोर्टलचा प्राचार्यांचा लॉगीन आयडी (जसे - DTXXXX_Principal) | प्राचार्यांचा आधार कार्ड क्रमांक | संस्था प्राचार्यांचे आधार कार्डवर असलेले नाव (जसेच्या तसे) | प्राचार्यांचे आधारकार्ड वर नमूद असलेल Gender | प्राचार्यांचा आधार संलग्नित मोबाईल क्रमांक | प्राचार्यांची आधार कार्डवर असलेली जन्मतारीख (dd-mm-yyyy) | प्राचार्यांचा ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

F/c

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७
ई-मेल -desk18@dtemaharashtra.gov.in , वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

हस्तदेय /ई-मेलद्वारे

जा. क्र:१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/४०२
दिनांक: ३१/ ०८ /२०२६.

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

विषय- महाडीबीटी २.० पोर्टलबाबतचे महाआयटीकडून संस्थांना देण्यात आलेले Login Credentials बाबत...

संदर्भ - १. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६/२२३, दि.२३/०४/२०२६
२. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२६-२७/४२७, दि.२८/०७/२०२६

उपरोक्त संदर्भीय १ च्या पत्रान्वये महाआयटीकडून महाडीबीटी २.० पोर्टलवर कार्यान्वित करण्यात आले असल्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त विषयांस अनुसरुन, या कार्यालयाच्या संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये, महाआयटीनुसार, संस्थेच्या ईमेल आयडीवर संस्था प्राचार्यांचे Login Credentials पाठविण्यात आलेले आहेत. परंतु काही संस्थांकडून डीबीटी पोर्टलचे Login Credentials प्राप्त झाले नसल्याबाबत किंवा कार्यरत असलेल्या प्राचार्यांना ओटीपी येत नसल्याबाबत तक्रारी दूरध्वनीवर प्राप्त झाल्या कारणास्तव ज्या संस्थांच्या प्राचार्यांना ईमेल आयडीवर Login Credentials प्राप्त झालेले नसतील किंवा कार्यरत असलेल्या प्राचार्यांना ओटीपी येत नसेल तर अशा संस्थांनी कार्यरत असलेल्या प्राचार्यांची अचूक माहिती पत्रात दिलेल्या तक्त्यामध्ये संस्थेच्या पत्राद्वारे दि.०३/०८/२०२६ पर्यंत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संबंधित विभागीय कार्यालयांना पाठविण्याबाबत सूचित करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच, त्या त्या संबंधित विभागीय कार्यालयांनी त्यांच्या पत्राद्वारे, अशा सर्व संस्थांची प्राप्त झालेली माहिती महाडीबीटी २.० पोर्टलवर अद्ययावत करण्यासाठी एकत्रितरित्या या कार्यालयास दि.०४/०८/२०२६ पर्यंत पाठविण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

उपरोक्त पत्रानुसार, विभागीय कार्यालयाकडून, महाडीबीटी २.० पोर्टलवर संस्थांच्या प्राचार्यांची माहिती अद्ययावत करण्यासाठी प्राप्त झालेल्या तपशीलानुसार, महाडीबीटी २.० पोर्टलवर अद्ययावत करतेवेळी ज्या संस्थांच्या प्राचार्यांची माहिती त्यांच्याकडून देण्यात आलेल्या आधार कार्डवरील माहितीशी जुळली आहे, अशा प्राचार्यांची माहिती या कार्यालयाकडून अद्ययावत करण्यात आली आहे व ज्या संस्थांच्या प्राचार्यांची माहिती चुकीची किंवा आधार कार्डशी जुळली नसल्याने , अशा प्राचार्यांची माहिती अद्ययावत करता आली नाही.

तरी, सर्व विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना व अभिमत विद्यापीठांना खालीलप्रमाणे सूचित करावे.

ज्या संस्थांच्या ईमेल आयडीवर महाडीबीटी २.० पोर्टल बाबतचे प्राचार्यांचे Login Credentials प्राप्त झालेले नसतील किंवा पूर्वीच्या प्राचार्यांची बदली झाली असल्यास किंवा संस्थेत कार्यरत नसल्यास किंवा निवृत्त झाले असल्यास किंवा कार्यरत असलेल्या प्राचार्यांना त्यांच्या लॉगीनचा (जसे-DTXXXX_Principal) ओटीपी येत नसेल तर अशा संस्थांनी कार्यरत असलेल्या प्राचार्यांची अचूक माहिती खालील तक्त्यामध्ये संस्थेच्या पत्राद्वारे आधार कार्डच्या

छायांकित प्रतीसह दि.०५/०९/२०२६ पर्यंत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संबंधित विभागीय कार्यालयांना पाठविण्यात यावी. जेणेकरुन संस्थेची प्राप्त माहिती महाडीबीटी २.० पोर्टलवर अद्ययावत करण्यात येईल व अद्ययावत केल्यानंतर महाआयटीकडुन सिस्टीमद्वारे Login Credentials पाठविण्यात येईल व तद्नंतर संस्थांना त्याचा वापर करुन महाडीबीटी २.० पोर्टलवरील पुढील कार्यवाही करता येईल. तसेच संस्थेकडून तंत्रशिक्षण संचालनालयाला परस्पर पाठविण्यात आलेले पत्र किंवा ईमेलची दखल घेतली जाणार नाही याची संस्थांनी नोंद घ्यावी.

| अनु. क्र. | संस्थेचा डीटीई कोड | संस्थेचे नाव | डीबीटी पोर्टलचा प्राचार्यांचा लॉगीनआयडी (जसे- DTXXXX_Principal) | प्राचार्यांचा आधार कार्ड क्रमांक | संस्था प्राचार्यांचे आधार कार्डवर असलेले नाव (जसेच्या तसे) | प्राचार्यांचे आधारकार्डवर नमूद असलेले Gender | प्राचार्यांचा आधार- संलंग्नित मोबाईल क्रमांक | प्राचार्यांची आधार कार्डवर असलेली जन्मतारीख (dd-mm-yyyy) | प्राचार्यांचा ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

तसेच, त्या त्या संबंधित विभागीय कार्यालयांनी त्यांच्या पत्राद्वारे, अशा सर्व संस्थांची प्राप्त झालेली माहिती महाडीबीटी २.० पोर्टलवर अद्ययावत करण्यासाठी एकत्रितरित्या (संस्थेच्या पत्रासह) या कार्यालयास दि.०८/०९/२०२६ पर्यंत पाठविण्यात यावी.

(डॉ. प्रमोद नाईक.)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई.